# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

**परिपत्रक क्र. कोविमं/योग्यता प्रमाणपत्र/ ४५८६ दि.२०/०८/२०२०**

**विषय - महाराष्ट्र राज्याबाहेरील अन्य मंडळाकडून किंवा परदेशातून आलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देताना योग्यता प्रमाणपत्र मिळविणेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कक्षेतील सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, मंडळ नियमावली विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ८०(२) अन्वये महाराष्ट्र राज्याबाहेरील अन्य मंडळाकडून किंवा परदेशातून शालांत प्रमाणपत्र परीक्षा इ. १० वी किंवा इ. ११ वी उत्तीर्ण होवून येणा-या विद्यार्थ्यांनी या राज्यात प्रवेश घेण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असून, सद्यस्थितीत कोरोना विषाणूचा प्रार्दूभाव असल्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षाचे निकाल निर्धारित वेळेपेक्षा उशिरा जाहिर झाल्याने अशा विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ साठी योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याच्या तारखा केवळ या शैक्षणिक वर्षा पूरत्या बदललेल्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्राचे मागणी अर्ज स्विकारण्याची **सुधारित तारीख १६ ऑगस्ट २०२० ते १५ ऑक्टोबर २०२०** अशी राहील. यासाठी परराज्यातून येणा-या विद्यार्थ्यांना रु.३००/- व परदेशातील विद्यार्थ्यांना रु.५००/- शुल्क आकारण्यात यावे.सदरचे शुल्क बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेत खाते क्रमांक ०९४७१०२१००००००५ व कोड क्रमांक ६४ नुसार चलनाने भरावे व चलनाची प्रत विहित कागदपत्रासोबत या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

२) **दिनांक १६ ऑक्टोबर २०२० ते १५ डिसेंबर २०२०** या कालावधीत प्राप्त झालेले अर्ज स्विकारताना विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी रु.१००/- विलंब शुल्क आकारावे.

३) **दिनांक १६ डिसेंबर २०२०** नंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.परंतु विद्यार्थ्याची वैयक्तिक प्रकरणिका पाहून अर्ज स्विकारावयाचे की नाहीत या संबधीचे अधिकार विभागीय मंडळ अध्यक्षांना राहतील.अशा प्रकरणी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क रु.१००/-आणि दि.१६ डिसेंबर पासून प्रतिदिनी रु. १०/- याप्रमाणे कार्यालयात अर्ज सादर करेपर्यंत अतिविलंब शुल्क आकारण्यात येईल व कनिष्ठ महाविद्यालयासाठी रु.१०००/- दंड आकारण्यात येईल.

**अत्यंत महत्वाचे-**

४) राज्याबाहेरील किंवा परदेशातील विद्यार्थ्यांनी इ.११ वी मध्ये प्रवेश घेतांना इ.१० वी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये किंवा तत्सम परीक्षेमध्ये इंग्रजी विषय घेवून उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. तसेच इ.११ वी विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी इ.१० वी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षमध्ये किंवा तत्सम परीक्षेमध्ये विज्ञान विषयात किमान ३५ टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

अ) इ.११ वी साठीच्या प्रस्तावातील त्रुटी पूर्तता **दि.२० फेब्रुवारी २०२१** पर्यंत करणे आवश्यक आहे.

ब) इ.१२ वी साठीच्या प्रस्तावातील त्रुटी पूर्तता **दि.०५ फेब्रुवारी २०२१** पर्यंत करणे अपरिहार्य आहे.

क) सदरच्या तारखांपर्यत त्रुटी पूर्तता न झाल्यास तदनंतर प्रतिदिनी रु.५/- प्रमाणे विद्यार्थ्यांकडून व रु.१००/-प्रति विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालयाकडून दंड आकारण्यात येईल.

ड) इ.१२ वी साठी त्रुटी पुर्तता करणेसाठी **३० सप्टेंबर २०२०** ही शेवटची तारीख असून तदनंतर मंडळ स्तरावरून विद्यार्थ्याची संपादणूक/निकाल रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५) राज्याबाहेरील किंवा परदेशातील मंडळातून आलेले जे विद्यार्थी इ.१२ वी मध्ये प्रवेश घेण्यास इच्छूक आहेत त्यांनी **१६ ऑक्टोंबर २०२०** पर्येतच अर्ज करणे अत्यावश्यक आहे. कारण फेब्रुवारीच्या परीक्षेसाठी आवेदनपत्र सादर करण्याचा ऑक्टोबर हा महिना कायमस्वरुपी ठरविण्यात आलेला आहे. मात्र एखादा विद्यार्थी त्याच्या पालकांच्या बदलीमुळे १६ ऑक्टोंबर नंतर राज्यामध्ये बदलून आल्यास त्याचा अर्ज विलंब व अतिविलंब शुल्क घेवून स्विकारण्यात यावा.

**६) ज्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता वेळेत केलेली नाही अशा विद्यार्थ्यांचा इ.११ वी परीक्षेचा निकाल कनिष्ठ महाविद्यालयांनी जाहीर करू नये. अंतिम योग्यता प्रमाणपत्राशिवाय जे कनिष्ठ महाविद्यालय इ.११ वी चा निकाल जाहीर करतील त्यांच्याकडून प्रति विद्यार्थी रु.१०००/- दंड वसूल केला जाईल. तसेच अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत इ.१२ वी च्या वर्गात पुढील वर्षी प्रवेश देण्यात येवू नये याची नोंद घ्यावी.**

Letter /pawar

१२०१

७) योग्यता प्रमाणपत्राचे मागणी अर्ज कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध असून, सदर अर्जाचे शुल्क **भारतीय विद्यार्थ्यांसाठी रु.१००/- व परदेशी विद्यार्थ्यांसाठी रु.५००/-**असे निर्धारीत करण्यात आले आहेत. सदरचे अर्ज रोखीने अथवा चलनाव्दारे रक्कम भरून मागणीपत्रासोबत चलनाची प्रत जोडून विभागीय मंडळ कार्यालयात मिळू शकतील.

८) **ज्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जात त्रुटी असतात त्यांचे योग्यता प्रमाणपत्र मंडळाकडून पाठविले जात नाहीत. तरी कनिष्ठ महाविद्यालयाकडून त्यांचे फेब्रुवारी परीक्षेचे आवेदनपत्र भरुन विद्यार्थ्यांना प्रविष्ठ केले जात असल्याचे मंडळाचे निदर्शनास आलेले आहे ही गंभीर बाब असून यापुढे असे निदर्शनास आल्यास संबधित विद्यार्थ्याचा इ ११ वी व इ.१२ वी परीक्षेचा निकाल रदद केला जाईल व विद्यार्थ्याच्या होणा-या नुकसानीची जबाबदारी संबधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.**

९) **इ.११ वी प्रवेश देताना विद्यार्थी हा इ. १० वी उत्तीर्ण महाराष्ट्र राज्याबाहेरील मंडळातील असल्यास त्या मंडळाची समकक्षता या मंडळाशी समकक्ष आहे किंवा नाही याची मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या मान्य समकक्षता यादीत पडताळणी करुन प्रवेश देण्यात यावा मात्र मान्यता नसलेल्या अशा विद्यार्थ्याच्या इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या मंडळाची /संस्थांची सर्व आवश्यक माहितीसह प्रस्ताव तात्काळ मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे. याबाबत मंडळाचा निर्णय अंतिम राहील.**

| **योग्यता प्रमाणपत्राच्या अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावीत.** |
| --- |
| १) इ.१० वी च्या परीक्षेची मंडळाव्दारे देण्यात आलेल्या गुणपत्रिकेची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत. |
| २) इ.१० वी च्या प्रमाणपत्राची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत. |
| ३) शाळा सोडल्याची दाखला / ट्रान्स्फर सर्टिफिकेटची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत. |
| ४) **मूळ मायग्रेशन सर्टिफिकेट (Original Migration Certificate)** |
| ५) इ.११ वी गुणपत्रिकेची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत (इ.१२ वी मध्ये प्रवेश घेतला असल्यास). |
| ६) इ.११ वी नंतर मायग्रेशन सर्टिफिकेट देण्याची पध्दत नसल्यास शाळा सोडल्याच्या दाखल्यावर / ट्रान्स्फर सर्टिफिकेटवर संबधित जिल्हा शिक्षणाधिका-यांची प्रतिस्वाक्षरी घेतलेल्या दाखल्याची प्रमाणित छायाप्रत. |
| ७) इ.१०वी उत्तीर्ण नंतर विद्यार्थ्यांने गॅप घेतला असल्यास त्याच्या गॅपबाबत माहिती व गॅप प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| ८) इ.१० वी उत्तीर्ण झाल्यानंतर Technical Diploma केला असल्यास इ.११ वी प्रवेश घेतेवेळी संबधित शासकीय तांत्रिक मंडळाचे नाहरकत दाखला किंवा मायग्रेशन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. |

वरील सर्व बाबींची संबंधित प्राचार्यांनी नोंद घेवून हे परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून मार्गदर्शन करावे.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति-
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.
प्रत माहीतीस्तव अग्रेषित -
१.मा.सचिव,राज्य मंडळ,पुणे- ४११ ००४.
२.विभागीय शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.
३.शिक्षणाधिकारी,(माध्यमिक),जिल्हा परिषद,सातारा/सांगली/कोल्हापूर.

Letter /pawar